आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २८० वा ● शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – एक कर्तबगार, कर्तव्यदक्ष, धाडसी अधिकारी अशी ओळख असलेले लातूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री मनोहरे यांनी स्वतःच्याच पिस्टल मधून गोळी मारून घेऊन आत्महत्याचा प्रयत्न केला ही बाब गंभीर आहे. परंतु अशी टोकाची भूमिका मनोहरे यांनी का व कशासाठी घेतले असावी यासंदर्भात तर्क वितरकांना उधान आले आहे काहीच कळत नाही डोकं बधिर झाला आहे.

दुसरा – अरे, मनोहरे प्रकरण सहज घेता येण्यासारखे नव्हे, मनोहरे हे कर्तव्यनिष्ठ आणि कायद्याच्या सचोटीत राहूनच शासकीय कारभार करीत होते, विदर्भ किंवा जालना,धारशिव, नांदेड येथील ही त्यांची शासकीय सेवा निर्भीड आणि न्यायिक होती तीच लातूर महानगरपालिकेतही मनोहरे राबवीत होते, राजकीय नेते किंवा शासकीय उच्चार पदस्थ धिकार्यासमोरही ते होयबा म्हणून मान हलवीत नव्हते ते कायदा व सुव्यवस्थेला बांधील राहूनच कार्य करीत होते. यापुढे करतील पण त्यांच्याबद्दल चुकीचा अंदाज लावणे योग्य वाटत नाही शांत बस.

एक – अहो, मनपा आयुक्त मनोहरे यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली समय सूचकता बाळगून उपाय डॉ. पंजाबराव खानसुळे यांनी तत्परता दाखवली, मुंबईकडे निघालेले डॉक्टर किनिकर लातूर आत परतले आणि मनोहरे यांच्यावर उपचार झाले पण काय कारण असावे हेच कळत नाही म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, सर्व काही बरोबर आहे. परंतु मनोहरे हेच शुद्धीवर नसल्याने आणि त्यांच्या पत्नी, मुले, वडील वगैरे काय घडले यांच्या संदर्भात बोलण्यास सांगण्यास असमर्थ असल्याने जोपर्यंत मनोहरे हेच शुद्धीवर येत नाही, तोवर काहीच अंदाज व्यक्त करता येत नाही, गडबड, बडबड करू नकोस.

एक – अहो, मनोहरे हे काही लेचेपेचे अधिकारी नव्हते ते एक शिक्षित घराण्यातील आहेत, ते सामाजिक, आर्थिक दृष्ट्या सबळ होते, अशी कुजबूज लातूर मनपा वर्तुळात होते आहे. मग मनोहरे यांनी गोळी झाडून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न का केला असावा, अशीच उलट सुलट कुजबूज होते आहे, म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, दीड शहाण्या मनपा आयुक्त मनोहरे यांच्या बद्दल इतरत्र फाटे फोडू नकोस ते कर्तव्यदक्ष न्यायिक प्रशासक होते. परंतु लातूर मनपा रुजू झाल्यापासून राजकीय, सामाजिक नेत्यापासून ते दूर होते. शासकीय निवासस्थानातूनच ते लातूर मनपाचा कारभार हाकत होते. त्यामुळे गोळी झाडून घेण्या प्रकरणी आपण कोणीच बोलू शकत नाही, समजलं.

एक – अहो, हे सारे बरोबर आहे, पण त्यांच्यावर असे कोणते दडपण होते, कोण वेठीस धरले होते, धाडसी गुणात्मक प्रशासक असलेल्या मनोहरे यांनी ही अशी टोकाची भूमिका का घेतली असावी हेच कळत नाही ?

## काय बोलता राव ?

दलित, बहुजन, मुस्लिम बहुल उत्तर प्रदेशात कायदा व सुव्यवस्थेत बिघाड झाल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशातील पोलीस यंत्रणेला खडसावले हे बरे झाले. परंतु बहुजन समाज पार्टी, समाजवादी पार्टीचे वर्चस्व असलेल्या उत्तर प्रदेशात भाजपाच्या योगी आदित्यनाथ यांची सत्ता असली तरी कायदा व सुव्यवस्था कशी काय बिघडली हेच कळत नाही.

**काय बोलता राव !**

अरे, प्रारंभीच्या काळात बहुजन समाज पक्षाच्या बहन मायावती यांनी भाजपाच्या सहकार्यातून सत्ता हस्तगत केली, पुन्हा स्वबळावर सत्ताकारण केले, समाजवादी पक्ष दुरावली त्यात बसपाचे संयुक्त सरकार आले पण बसपा नेत्या बहन मायावती यांच्या अहंकार दुणावला आणि आज घडीला बसपा, सपा उत्तर प्रदेशात शून्य असल्यागत, असल्याने भाजपाच्या योगी आदित्यनाथ यांची चलती आहे, धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचारावर काँग्रेस, बसपा, सपा एकत्र येण्यास तयारच नाही. प्रत्येक जण अहंकारात, स्वबळाची भाषा करीत असल्याने, भाजपा योगी आदित्यनाथ चे धावते आहे. आज कायदा व सुव्यवस्था ढासळली आहे तर उद्याला प्रशासन, न्याय संस्था ही ढासळू शकत नाही हे कशावरून सांगावे. मग बोला दाजीबा !

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १८ तास आभ्यास उपक्रम,२४९ विध्यार्थ्यांचा सहभाग, जिल्हाधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन,जेष्ठ महिलांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद.

लातूर – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्र्वारत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त लातूरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध उपक्रम लातूर शहरात राबविण्यात येत आहेत, त्याचाच एक भाग म्हणून विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी सलग १८ तास अभ्यास हा उपक्रम गुरुवारी शहरातील सिद्धिर्थ बौद्ध विहार या ठिकाणी घेण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात नेहमी १८ तासापेक्षा जास्त वेळ आभ्यास करून भारताची राज्यघटना लिहिली, त्या महामानवाला सलग १८ तास आभ्यास करून २४९ विध्यार्थ्यांनी अभिवादन केले आहे.





दुपारच्या सत्रात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे व भाजप नेते अजित पाटील कव्हेकर यांनीही या अनोख्या उपक्रमाला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी समता सैनिक दल, आर्दीसह परिसरातल्या जेष्ठ महिलांनी देखील या उपक्रमात उत्स्फूर्त पणे सहभाग नोंदवला आहे. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशील चिकटे सचिव राहुल कांबळे, बाबा कांबळे, आंबेडकरवादी मिशन स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक दीपक कदम, प्रा. बापू गायकवाड. डीएस नर्सिंगे. भारतीय बौद्ध महासभेचे लातूर जिल्हाप्रमुख तथा अध्यक्षा आशाताई चिकटे महिला अध्यक्ष शारदाताई हजारे सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, विकास सर वंदनाताई कांबळे, उपाध्यक्ष रामदास साबळे,राजेंद्र क्षीरसागर, गौतम बनसोडे, मंगलताई सुरवसे कोषाध्यक्ष मायाताई कांबळे,सपना देडे, सुरेखा भालेराव सचिव प्रेमनाथ कांबळे,राजाभाऊ उबाळे, भाऊराव कांबळे रवींद्र राजेगावकर,आनंद ढोणेराव, देवराव जोगदंड, लक्ष्मण कांबळे,दत्तात्रय भोसले सैनिक छाया माने, शालू साबळे, सपना सूर्यवंशी, करुणा सूर्यवंशी, शीला जोगदंड आधी उपस्थित होते.

## महात्मा फुले अद्वितीय समाज सुधारक होते-भिक्खू पय्यानंद थेरो

लातूर : क्रांतीरत्न महात्मा ज्योतीबा फुले हे अठराव्या शतकातील पुरोगामी विचाराचे थोर व्यक्तीमत्व होते. त्यांनी समाजात, स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा, कर्मकांड, रूढी परंपरा याबाबतीत वैचारीक प्रबोधन दिले. त्यामुळे महात्मा फुले हे समाजसेवक आणि भारतीय इतिहासातील अद्वितीय समाज सुधारक होते असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.




महात्मा फुले यांच्या १९८व्या जयंती निमित्त महाविहार धम्मसेवक ग्रुपच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीरत्न महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णकृती पुतळ्यास भिक्खू पय्यानंद थेरो यांनी महाविहार धम्मसेवक ग्रुप सदस्यासह पुष्पहार घालून अभिवादन केले.

पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, महात्मा फुले हे स्त्री शिक्षणाचे जनक आहेत. पुण्यामध्ये एकुण त्यांनी अठरा शाळा काढल्या. त्यामध्ये प्राधान्याने सर्व समूहातील महिलानां शिक्षण दिले. अस्पृश्यांना आपल्या वाड्यातील विहिरीचे पाणी वाटप केले. शेतकऱ्यांचे दुःख, विधवा पुर्नवसन, अनाथाश्रमे, पाळणागृहे अशा अनेक गोष्टी समाज परिवर्तनासाठी तन–मन–धनाने महात्मा ज्योतिबा फुले यांनी केल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपले गुरु मानले आहे.

या वेळी प्रा. यु. डी. गायकवाड, उदय सोनवणे यांनीही या वेळी आपापले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी पांडुरंग अंबुलगेकर, अशोक कांबळे, ज्योतीराम लामतुरे, भरत कांबळे, उमाकांत धावारे, मिलिंद धावारे, आशा चिकटे, शोभा सोनकांबळे, पंचशीला बनसोडे, पंचशीला बनसोडे, रेखा घोबाळे, अंजली सोनकांबळे, शकुंतला नेत्रगावकर, पृथ्वी सोनवणे ई. सह धम्मसेवक ग्रुपचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत लातूर रेल्वे स्टेशनच्या आधुनिकीकरणासाठी १९ कोटींचा निधी

मुंबई : भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुंबई येथे दिली. लातूर रेल्वे स्थानकाचाही यामध्ये समावेश असून यासाठी १९ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत मुंबई येथे झालेल्या या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्राच्या रेल्वे पायाभूत सुविधेत होत असलेल्या दर्जेदार सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री.वैष्णव यांचे आभार मानले.

या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, लोहमार्ग टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, संगली, अमरावती, भुसावळ, इत्यादी. तसेच, उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे, जसे की – अकलकोट रोड, दौंड, इगतपुरी, चांदा फोर्ट, माळाड, डोंबिवली, चिंचवड, इत्यादीचा समोवश आहे.

या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे. अजनी स्टेशन (२९७.८ कोटी), नागपूर जं. (५८९ कोटी), नेताजी सुभाष चंद्र बोस इतवारी जं. (१७.४ कोटी), जालना (१८९ कोटी), संभाजीनगर (२४१ कोटी), रोटेगाव (१२ कोटी), अहिल्यानगर (३१ कोटी), भायकुला (३५.५ कोटी), चिंचपोकळी (५२ कोटी), चर्नी रोड (२३ कोटी), छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल (१८१३ कोटी), ग्रॅट रोड (२७ कोटी), लोवर परेल (३० कोटी), मरिन लाईन्स (२७.७ कोटी), सण्डहर्स्ट रोड (१६.४ कोटी), मुर्तिजापूर स्टेशन (१३ कोटी), बडनेरा (३६.३ कोटी), बारामती (११.४ कोटी), दौंड (४४ कोटी), केडगाव (१२.५ कोटी), परळी वैजनाथ (२५.७ कोटी), भंडारा रोड (७.७ कोटी), गोंदिया ४० कोटी), तुमसर रोड (११ कोटी), टिटवाळा (२५ कोटी), शेगाव (२९ कोटी), बल्लारशाह (३१.४ कोटी), चंद्रपूर (२५.५ कोटी), चांदा फोर्ट (१९.३ कोटी), धुळे (९.५ कोटी), लासलगाव (१०.५ कोटी), **(पान ३ वर)...**

## लातूर धाराशिवसह मराठवाड्यातील अमली पदार्थांचे कनेक्शन चिंताजनक पोलीस यंत्रणेने विशेष मोहीम राबवून या व्यवसायाची पाळेमुळे उखडून टाकावीत - माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर (प्रतिनिधी) : प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत, विकासाची कास धरलेल्या, लातूर धाराशिवसह मराठवाड्यात नव्याने उघड झालेले अमली पदार्थाचे कनेक्शन ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचे स्पष्ट करून पो१लीस यंत्रणेने विशेष मोहीम राबवून या व्यवसायाची पाळे–मुळे उखडून टाकावीत अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या संदर्भाने म्हटले आहे की, शिक्षण, उद्योग, व्यापार, कृषी, सहकार आणि आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून नावारूपाला येत असलेल्या लातूर जिल्ह्यातील काही लोक अमली पदार्थ निर्मिती तसेच विक्रीच्या प्रक्रियेत गुंतल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकाराने मन सुन्न झाले असून, राज्यातील पोलीस यंत्रणा नेमके काय करीत आहे? हा प्रश्न आता निर्माण झाला आहे, अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही, जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर मराठवाड्यातील जनता प्रगतीच्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करीत असताना अलीकडच्या काळात, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात चुकीच्या प्रवृत्तीचा प्रवेश होऊन अवैध व्यवसाय वाढू लागले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर येथे अमली पदार्थांच्या व्यवसायाचे कनेक्शन उघड झाल्यानंतर, त्याचे लोण आता बीड, धाराशिव, लातूरपर्यंत येऊन पोहोचले आहे. सध्या तुळजापूरचे अमली पदार्थ संदर्भातील प्रकरण गाजत असतानाच आता लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यात अतिदुर्गम भागात रोहिणा येथे एमडी ड्रग्स निर्मितीचा अवैध उद्योग सुरू असल्याचे उघड झाले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे ठाणे जिल्ह्यात पोलीस म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने आपल्या गावात ड्रग्स निर्मितीचा व्यवसाय उभारल्याचे समोर आले आहे. अमली पदार्थाच्या महाभयंकर व्यवसायाचा तुळजापूरसारखे तीर्थक्षेत्र आणि लातूरसारख्या शैक्षणिक केंद्राशी संपर्क येणे ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र शासन आणि गृह विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन विशेष मोहिमेद्वारे अशा अवैध व्यवसायाची पाळेमुळे उखडून टाकणे आवश्यक बनले असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. अमली पदार्थाचा हा व्यवसाय कोण करते आहे याचा शोध घ्यावा, त्यांच्या पाठीशी कोण लोक आहेत याचाही छडा लावावा आणि या सर्वावर कडक स्वरूपाची कार्यवाही करावी असेही त्यांनी म्हटले आहे.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बाह्यरुग्ण विभाग १३ एप्रिल रोजी सुरु राहणार

लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टीमुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) १४ एप्रिल २०२५ रोजी बंद राहणार आहे. मात्र, रविवार, १३ एप्रिल २०२५ रोजी रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) नियमित वेळेप्रमाणे अर्धवेळ सुरु राहील, असे रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मद्यविक्री बंद

लातूर : लातूर जिल्ह्यात १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात येणार आहे. जयंती उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिले आहेत. मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ तसेच नमूद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर – घुगे यांनी १४ एप्रिल २०२५ रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाच्या अंमलबजावणीमध्ये कुचराई करणाऱ्या अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारका विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात यईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## प्रा. सुभाष भिंगे यांचा अमृतमहोत्सव, डॉ लोहिया अभ्यास केंद्राचे उद्घाटन

लातूर : दयानंद कला महाविद्यालयातील लोक प्रशासन विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. सुभाष भिंगे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अमृतमहोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि–१३) सकाळी १० वाजता माणूस प्रतिष्ठान संचलित 'माझं घर', कारंजे खडी केंद्राजवळ, बुधोडा येथे आयोजिण्यात आला आहे. प्रा. भिंगे यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव व्हावा म्हणून प्रा. भिंगे यांच्या माजी विद्यार्थी आणि स्नेहीजनांनी मिळून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याप्रसंगी 'माझं घर' येथे डॉ. राम मनोहर लोहिया अभ्यास केंद्राचे उद्घाटन देखील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गुरुवर्य प्रा. सुभाष भिंगे अमृतमहोत्सव संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## महिलांचे उध्दारकर्ते डॉ बाबासाहेबआंबेडकर

सोमवार १४ एप्रिल रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वि जयंती आहे. १४ एप्रिल १८९१ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्ययांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्र्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# सत्ताधिकारीच समस्या.. ?

## संपादकीय...

राज्य, राज्यासह भारताचा सर्वांगीण विकास करणे, समस्यांचे निराकरण करणे, गुंतागुंतीच्या विषयावर तोडगा काढणे, नवनवीन योजना कार्यान्वित करून विकास साधने, बेरोजगारीचे निर्मूलन करण्यासाठी रोजगार निर्माण करणे, सुशिक्षित बेकारांचे प्रश्र्न मिटविण्यासाठी शासकीय नोकर भरती करणे, महागाई, भ्रष्टाचाराला आळा घालणे, अन्याय, अत्याचार, बलात्कार, झुंडशाहीला आळा घालणे, जातीय धार्मिक नंद्याला रोखणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे ही सरकारचे सत्ताधाऱ्यांचे सुलभ स्वच्छ पारदर्शक हक्काचे कर्तव्य असताना सत्ताधारीच जातीय धर्मात तेढ निर्माण करून कायदा व संस्थेला गालबोट लावून राजकारण निर्माण करू पाहत असतील तर हे असले शासन जनतेचे रक्षक की भक्षक आहेत, असावेत अशीच उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त उडताना दिसते आहे. ती अनाठही नसावी असे बोलले जात आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केंद्र सरकारचा कारभार चालवित आहेत पण ते भारताचे प्रधानमंत्री नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सेवक आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते असे गृहीत धरूनच कार्यरत असल्याने, भाजपा मित्रपक्ष शासित राज्यासह भाजपाविरोधी राज्यातही तेथील सरकारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात कारभारावर नाराज आहेत पण सत्तेचा लगाम हे मोदींच्या हातात असल्याने सर्व पक्ष सत्ताधारी अचूक वेळ साधून तो लगामच हिसकावण्याचा कृतिशील आराखडा तयार करीत असल्याची प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात होताना दिसते आहे, ती अवास्तव असू नये असे वाटते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे चर्चेविना मनमानी कार्ये प्रणाली अवलंबून वटहुकुनी कारभार करीत असल्याने, सत्ताधारी, विरोधकही हदबल होतात. पण बहुमतामुळे आवाज दाबला जात असल्याने, कोणीच लोकप्रतिनिधी बोलू शकत नाहीत, ही वास्तव अडचण, डोकेदुखीच वाटते. कारण लोकशाही राज्यात वटहुकूमशाही पद्धतीने कारभार चालत असेल तर सर्वधर्मसमभाव असा रेटा लावणाऱ्या राष्ट्रीय समाजसेवक संघ आणि भाजपाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कूट प्रशासन दिसत नाही का, असेही सर्वसामान्यसह प्रसार माध्यमातून उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे, ती वास्तव ठरावी. महाराष्ट्र सह भारतात शिवजयंती, ईद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महावीर जयंती आणि हिंदूचे सण, उत्सव समोर असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपा प्रणित विश्र्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने औरंगजेबाच्या समाधी हटविण्यावरून वादन निर्माण केले, हाही एक सत्ताधिकार्याचेच एक अंग मानले जाते त्यात पुन्हा महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी औरंगजेब यांची जिथं कबर आहेत त्या खुलताबादचे नाव बदलून रत्नपुर हे नाव देण्यात यावे अशी सरकार मान्य मागणी केली. यावरून केंद्र सरकारने राज्य सरकारे जनतेचा सार्वजनिक विकास, समस्या निवारण्यासाठी आहेत की, समाजात तेढ निर्माण करून स्वतःची खुर्ची, मतलबी राजकारण आबादीत ठेवण्याची कार्यरत आहेत ,अशीच शंकात्मक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे ती आवाजही नसावी असे वाटते.

बाकीच्यांचे जाऊ द्या पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतःला धर्मनिरपेक्ष पुरोगामी समतावादी राजकारणी म्हणून घेतात तर मग असले जातीवादी समस्या विशेष समोर आणणाऱ्या काबुत का ठेवत नाहीत, एखाद्याला चकमकीत ठार केले जाऊ शकते, मग अशा समाज दुर्वांना सत्तेतून, समाजातून हद्दपार का करू नये, अशी लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे त्याचे काय ?

# आधुनिक भारत आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर!

आधुनिक काळातील भारतीय स्वातंत्र्य लढ्याला दोन महत्त्वाचे पैलू लाभलेले दिसतात. एक सामाजिक स्वातंत्र्य आणि दुसरे राजकीय स्वातंत्र्य. बहुसंख्य भारतीय जनतेचे सामाजिक स्वातंत्र्य परकीय इंग्रजांनी नव्हे तर भारतात अस्तित्वात असलेल्या मानवघातकी स्वरूपाच्या कुजकट रूढी परंपरांनी हिरावून घेतले होते. त्या रूढी-परंपरांना धर्माची प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सामाजिक स्वातंत्र्य म्हणजे देशातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचे, स्वतःच्या व्यक्तिमत्वातील शक्तींचा विकास घडवून आणण्याचे, स्वतःची प्रगती करण्याचे स्वातंत्र्य. जिथे माणसामाणसातील भेदाभेद आणि उच्चनीचता नसते, जिथे माणसाकडूनच माणसाचे शोषण होत नसते, माणसाकडूनच माणसांचे मानवी हक्क हिरावले जात नसतात,जिथे समता असते, इथे अंधश्रद्धा अस्तित्वात नसतात तिथेच सामाजिक स्वातंत्र्य असते.भारतात प्रामुख्याने वर्ण जातिव्यवस्थेने आणि पुरुषप्रधान व्यवस्थेने देशातील बहुसंख्य माणसांचे सामाजिक स्वातंत्र्य हिरावून घेतलेले होते.

निसर्गतः माणसाला वर्णजात नसते माणूस हा फक्त माणूस असतो.विशिष्ट समूह किंवा कुटुंबात जन्मलेल्या मुलांमध्येच विशिष्ट गुणवत्ता असतात,हे वर्णजातिव्यवस्थेचे गृहीतक चुकीचे आहे.कुठेही जन्माला आलेल्या मानवी मुलांमध्ये कोणतेही गुण असू शकतात. त्याच्यात कोणते गुण आहेत हे जन्मल्याबरोबर किंवा बालवयातच कळत नसते तर त्याला वेगवेगळ्या गोष्टी शिकण्याची संधी दिल्यानंतर त्याच्यात कोणकोणते गुण आहेत हे सिद्ध होत असते. वर्णजातिव्यवस्थेने अशी कुठलीही संधी न देताच काही समूहातील व्यक्तींना बुद्धिमान,काही व्यक्तींना लढावू,काही व्यक्तींना उत्पादक तर काही व्यक्तींना संपूर्णपणे गुणहीन ठरवले होते.

शिक्षण बंदी, शस्त्रबंदी,स्पर्श बंदी,संचारबंदी व व्यवसायबंदी ही भारतातील वर्णजातिव्यवस्थेने व पुरुषप्रधान व्यवस्थेने बहुसंख्य स्त्री पुरुषांवर लादलेली पारतंत्र्ये होती. या सर्व प्रकारच्या पारतंत्र्यातून भारतातील बहुसंख्य लोकांना मुक्त करणारा स्वातंत्र्यलढा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालवला.वर्णजातिव्यवस्थेने भारतातील बहुसंख्य असलेल्या स्त्री शूद्रअतिशूद्रांवर ज्ञानबंदी लादलेली होती.वर्णजातिव्यवस्थेच्या विषमतावादी नियमांचे कठोरपणे पालन करणारी पेशवाई बुडाल्यानंतर आणि भारतात इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाल्यानंतरच स्त्री शूद्रांना शिक्षण देण्यासाठीचे अनुकूल वातावरण निर्माण झाले.विद्येविना मती जाते, मतीविना नीती जाते, नीतीविना गती जाते,गतीविना वित्त जाते,वित्ताविना शूद्र खचतात आणि इतके अनर्थ एका अविद्येमुळे होतात हे महात्मा फुले यांनी सांगितले होते.ज्यांच्यावर शिक्षणबंदी लादली होती त्यांच्या शालेय शिक्षणाची व्यवस्था सुरू केली होती.भारतामध्ये सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपला गुरु मानले होते.पुढील काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबईमध्ये सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबादमध्ये मिलिंद कॉलेज सुरू केले आणि वर्णव्यवस्थेने ज्यांच्यावर ज्ञानबंदी लादली होती त्यांना उच्च शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करून दिली. ज्ञान बंदी, स्पर्श बंदी आणि व्यवसाय बंदी लादणाऱ्या विषमतावादी व्यवस्थेने भारतातील अस्पृश्य ठरवलेल्या प्रचंड मोठी लोकसंख्या असलेल्या जनतेला बहिष्कृत केले होते. पिढ्यानपिढ्या मूकपणे खूप मोठी वेदना सहन करायला भाग पाडले होते. या बहिष्कृत केलेल्या मुक्या जनतेमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक,बहिष्कृत भारत,जनता ही नियतकालिके चालवली.

प्रॉब्लेम ऑफ रुपी अर्थात भारतीय रुपयाचा प्रश्र्न हा ग्रंथ लिहून इंग्रज भारताचे कसे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण करतात हे सिद्ध करून दाखवले. शूद्र पूर्वी कोण होते?,जातिसंस्थेचे उन्मूलन,क्रांती आणि प्रतिक्रांती,भारतीय मुद्रा आणि बँक व्यवस्थेचा इतिहास, हिंदुत्वाची कोडी,पाकिस्तान संदर्भातील विचार असे अनेक ग्रंथ लिहून समग्र भारतीयांचे खूप मोठे प्रबोधन केले.अनेक ठिकाणी सभा-संमेलने घेऊन तुम्ही देखील माणूस आहात आणि तुम्हाला देखील माणसाचे सारे अधिकार आहेत.गुलामासारखे जगू नका स्वाभिमानाने जगा अशा प्रकारचे प्रबोधन करत व्यवस्थेने दलित बनवलेल्या लोकांची अस्मिता जागृत केली. इंग्रजांनी घेतलेल्या गोलमेज परिषदां मध्ये सक्रियपणे सहभागी होत इंग्रजांना भारतातली विषमतावादी व्यवस्थेची गंभीरपणे जाणीव करून दिली आणि बहिष्कृत भारताच्या सामाजिक राजकीय हक्कांना मान्यता मिळवून घेतली. मानवतेला काळीमा फासणारी अस्पृश्यतेची चाल संपवण्यासाठी विविध आंदोलने केली.जात,धर्म,पंथ,भाषा प्रांतीयतेने तुटलेल्या आणि फाटलेल्या समग्र भारतीयांना एकराष्ट्रीयत्वाच्या धाग्यात बांधणारे संविधान लिहून भारताचे बलाढ्य राष्ट्र बनवण्याच्या वैचारिक आणि मूल्यात्मक दिशा दिल्या.भारतीय महिलांचे घरा-घरात होणारे शोषण थांबवण्यासाठी आणि त्यांना सन्माननीय जीवन मिळवून देण्यासाठी संसदेमध्ये हिंदू कोड बिल मांडले.भारतीय संस्कृतीतील सर्वोच्च नैतिक बिंदू असलेल्या बौद्ध धम्माची लाखो बहिष्कृत भारतीयांना दीक्षा दिली.

भारतात अस्तित्वात असलेली बहुसंख्य माणसांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी वर्णजाति व्यवस्था पृथ्वीवर जन्माला येणारी सर्व माणसे हाताच्या बोटामध्ये जेवढे अंतर असते तेवढे जुजबी अंतर वगळता सारखीच असतात हे नैसर्गिक सत्य नाकारणारी होती.या व्यवस्थेने विशिष्ट समूहातील जन्माच्या आधारे काही माणसांना विशेष अधिकार दिले होते तर बहुसंख्य माणसांचे मानवी अधिकार हिरावून घेतले होते. कोणाचेही नैसर्गिक मानवी अधिकार हिरावणे म्हणजे त्याचे स्वातंत्र्य हिरावणेच असते. वर्णजातिव्यवस्थेने भारतीय माणसांची कोंडी केली होती. स्वतःच्या इच्छेप्रमाणे स्वतःचा विकास करून घेण्यावर जी व्यवस्था बंधने लादते ती व्यवस्था माणसांचे नैसर्गिक स्वातंत्र्य हिरावणारीच असते. फक्त ब्राह्मणांनी पुरुषांनी ज्ञान घ्यावे आपल्याच समूहातील फक्त पुरुषांपुरतेच वाटावे. क्षत्रियांनी फक्त युद्धकला शिकावी आणि लढावे. बाकी ज्ञान घेण्याचा प्रयत्न करू नये. वैश्यानी फक्त उत्पादन आणि व्यापार करावा बाकीच्या फंदात त्यांनी पडू नये. शूद्रांमध्ये कुठलीच गुणवत्ता नसते म्हणून त्यांनी फक्त वरील वर्णांची सेवा करावी. अति शूद्रांनी गलिच्छ आणि अतिकष्टाची कामे करावीत त्या व्यतिरिक्त दुसरे काही करण्याचा मुळीच प्रयत्न करू नये. ही सारी बंधने साऱ्यांचीच कोंडी करणारी होती. माणसाचा माणूस म्हणून मुक्त विकास होण्याच्या आड उभी राहणारी होती. या कोंडी करणाऱ्या व्यवस्थेमुळे इतिहासकाळात भारताचे फार मोठे नुकसान झाले.या बंधने लादणाऱ्या व्यवस्थेने सबंध माणसांची बुद्धिमत्ता विकसित होऊ दिली नाही,तसेच शौर्यधैर्य पराक्रमही विकसित होऊ दिला नाही. त्यामुळे संपूर्ण भारतच मध्ययुगात मागासलेला राहिला.जेव्हा जेव्हा परकीय आक्रमणे झाली तेव्हा तेव्हा भारताचा पराजय झाला आणि आपला देश परकीयांच्या गुलामीमध्ये गेला. माणसाचे मानवी हक्क नाकारणारी आणि माणसाला माणसापासून तोडणारी वर्णजातिव्यवस्था मानवघातकी आहे तशीच राष्ट्र घातकही आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या व्यवस्थेने केलेल्या कोंडीतून भारतातील बहुसंख्य माणसांना मुक्त करणारा स्वातंत्र्यलढा लढवला.

माणसांचे विषमतेच्या पायावर स्तरीकरण करणाऱ्या वर्णजातिव्यवस्थेने माणसांचे केवळ अधिकारच हिरावून घेतले नाहीत तर शूद्रअतिशूद्र ठरवलेल्या माणसांची फार मोठी विटंबना केली. त्यांना गुलाम बनवून सतत अपमानीत केले. माणसांवर लादलेली अस्पृश्यता हे या मानवी अपमानकारी व्यवस्थेचे भयंकर टोक होते. जन्मता प्रत्येक माणूस केवळ 'माणूस' म्हणून जन्माला येत असतो.कोणताही माणूस जन्मतःच राजा नसतो,रंक नसतो, उच्च नसतो,नीच नसतो,शूद्र अथवा अतिशूद्र नसतो.जन्माला येणारं प्रत्येक मूल फक्त माणसाचं मूल असतं. त्याच्या व्यक्तिमत्वात असलेली गुणवत्ता सिद्ध करण्याची त्याला संधी दिल्यानंतर ते मूल नेमकं काय आहेङ्कोण आहेङ्हे ठरवायला हवं. पण वर्णजातिव्यवस्थेने विशिष्ट ठिकाणच्या जन्मावरूनच मानवी बाळाला उच्च वा नीच, श्रेष्ठ वा कनिष्ठ, सवर्ण अथवा शूद्र अतिशूद्र ठरवून टाकलं. एवढंच नाहीतर शूद्र अतिशूद्र ठरवलेल्या समूहातील माणसांना पिढ्यानुपिढ्या काबाडकष्टाची आणि गलिच्छ अशी कामे करायला भाग पाडलं. दुसरी कामे करण्याची इच्छा असली तरी ती कामे त्यांना करू दिली नाहीत. हे लोक गलिच्छ कामे करतात म्हणून त्यांचा स्पर्शच विटाळवाना मानला. त्यांना कुणीच जवळ घेतलं नाही. सतत दूर दूर लोटलं. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी पाणी भरू दिलं नाही. एका पंगतीत जेऊ दिलं नाही. मंदिरात येऊ दिलं नाही. घरात येऊ दिलं नाही. ज्ञान घेऊ दिलं नाही. हातात शस्त्र होऊ दिलं नाही. मनाला वाटेल तो व्यवसाय करू दिला नाही. पैसा कमावू दिला नाही. अंगावर चांगले कपडे घालून दिले नाहीत. चांगलं घर बांधू दिलं नाही. वर्णजातिव्यवस्थेनं असं हे टोकाचं पारतंत्र्य लादलेलं होतं. या अमानुष अशा टोकाच्या पारतंत्र्यातून भारतातील कोट्यावधी लोकांना मुक्त करण्याचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलं. विषमतेचे रक्षण करणाऱ्या हिंदू धर्माबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर एके ठिकाणी म्हणतात,ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे हा अधर्म मानला जातो तो धर्म नसून रोग आहे. ज्या धर्मात अमंगल पशुचा स्पर्श झाला असता चालतो पण माणसाचा स्पर्श चालत नाही तो धर्म नसून वेडगळपणा आहे. जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे. जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून शिक्षा आहे.

जन्मतः अतिशूद्र ठरवलेल्या लोकांना अस्पृश्य बनवणे, त्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरून न देणे हे अमानुष स्वरूपाचे पारतंत्र्य होते. हे पारतंत्र्य इंग्रजांनी लादलेले नसून भारतातील स्वतःला उच्चवर्णीय म्हणवून घेणाऱ्या मंडळींनी लादले होते. इंग्रजी राजवटीतील मुंबई कायदेमंडळाने सरकारी खर्चाने बांधलेल्या सर्वच सार्वजनिक ठिकाणांवर अस्पृश्यांसह सर्वांना वहिवाटीचा अधिकार असेल असा ठराव पास केला. या ठरावाचे अनुसरण करत रायगड जिल्ह्यातील महाड इथल्या नगरपालिकेने देखील आपल्या शहरातील चवदार तळे अस्पृश्यासह सर्वांसाठी खुले करण्याचा ठराव पास केला.परंतु या ठरावाची अंमलबजावणी मात्र होत नव्हती.कारण विषमतावादी उच्चवर्णीयांचा येथे प्रचंड मोठा दबदबा होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हकार्यांसोबत २० मार्च१९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर पाणी पिण्याचा नैसर्गिक हक्क प्रस्थापित करण्यासाठी फार मोठा सत्याग्रह केला.हा भारतातील सामाजिक स्वातंत्र्याच्या लढ्यातला अत्यंत महत्त्वाचा पैलू होता. या सत्याग्रहामुळे पाणी पिण्याससारखा नैसर्गिक हक्क हिरावून घेणाऱ्या अमानुष अशा अस्पृश्यतेच्या प्रथेची कठोर चिकित्सा सुरू झाली. २५ डिसेंबर१९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील आंदोलनात 'मनुस्मृती' या वर्णजातीभेद करणाऱ्या आणि स्त्रीपुरुषात भेदाभेद करणाऱ्या भेदाभेदी न्यायाची व्यवस्था करणाऱ्या, विषमतेचा उघडपणे पुरस्कार करणाऱ्या ग्रंथाचे जाहीरपणे दहन केले आणि स्त्री-पुरुषांच्या मुक्तीच्या लढ्याला अधिक गतिमान केले.२ मार्च १९३० ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेला काळाराम मंदिर सत्याग्रह भारताच्या सामाजिक स्वातंत्र्यलढ्यातील लक्षणीय असा सत्याग्रह होता.मुद्दा हा होता की स्वातंत्र्य हिरावून घेणारे आणि स्वातंत्र्य मागणारे लोक एकाच धर्माचे होते. जगात हिंदू खेरीज दुसरा कुठलाही धर्म नाही की जो आपल्याच धर्मातील बहुसंख्य लोकांना आपल्याच धर्माच्या प्रार्थना स्थळामध्ये प्रवेश नाकारतो. आणि आपल्याच धर्मातील लोकांना आपलेच धर्मग्रंथ वाचण्यावर बंदी घालतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही बंधने तोडून माणसाला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य देण्यासाठी लढा उभा केला.

९ एप्रिल १९३० रोजी राम नवमी होती. सनातनी हिंदू आणि सत्याग्रही नेत्यांमध्ये अशी एक तडजोड झाली की स्पृश्य व अस्पृश्यांनी मिळून रामाचा रथ ओढावा. पण अस्पृश्यांनी रथाला हात लावण्यापूर्वीच सत्याग्रहींना हुलकावणी देऊन तो रथ दुसरीकडे पळवला.सत्याग्रहींनी रथाचा पाठलाग केला.रथ अडवला तेव्हा मारामारी सुरू झाली.बाबासाहेबांच्या अनुयांवर दगडांचा वर्षाव सुरू झाला.याच गडबडीत पोलिसांचे कडे तोडून भास्कर केंद्रे नावाचा सत्याग्रही मंदिरात घुसला पण सनातन्यानी त्याला फोडून काढले. तो बेशुद्ध पडला. दगडफेकीत आंबेडकरांसह अनेकजण जखमी झाले. नंतर बाबासाहेब गोलमेज परिषदेसाठी निघून गेले हा सत्याग्रह पुढील पाच वर्षे दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली चालला. पण सनातन्यानी अस्पृश्य ठरवलेल्या हिंदूंना मंदिरात प्रवेश दिलाच नाही. ज्यांना अस्पृश्य ठरवले ते देखील इतर माणसांसारखे माणूसच आहेत हेच अस्पृश्यतेची प्रथा लादणाऱ्या मंडळींनी नाकारलेले होते.३ मार्च १९३४ रोजी पत्र पाठवून बाबासाहेबांनी दादासाहेब गायकवाड यांना कळवले की आता सत्याग्रह सुरू ठेवून शक्ती वाया घालवण्यापेक्षा ती शक्ती राजकीय हक्क व शिक्षण घेण्याची सोय मिळवण्यासाठी वापरावी.आता सत्याग्रह बंद करण्यात यावा. वामनदादा कर्डकांनी पुढील काळात एक गाणं म्हटलं 'उघडलाच नाही काळ्या रामाचा दरवाजा.'

२ मार्च १९३० रोजी केलेल्या भाषणात डॉबाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत.मंदिरात प्रवेश केल्यामुळे आपले प्रश्र्न सुटणार नाहीत.आपले प्रश्र्न राजकीय आहेत,सामाजिक,धार्मिक,आर्थिक आणि शैक्षणिक आहेत.काळाराम मंदिरात प्रवेश करणे म्हणजे हिंदू मनाला केलेले आवाहन आहे. उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याला आपल्या हक्कांपासून अनेक पिढ्यांपासून दूर ठेवले. आता तेच हिंदू आपल्याला आपला मानवी हक्क देतील का हा प्रश्र्न या काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून मी विचारत आहे. हिंदू मन हे आपल्याला एक मानव म्हणून स्वीकारावयास तयार आहे की नाही याची पडताळणी या सत्याग्रहाद्वारे होणार आहे.

बाबासाहेब जी पडताळणी केली त्या पडताळणीत सवर्ण हिंदू मनाने अस्पृश्य ठरवलेल्या लोकांचे मानवी हक्क नाकारल्याचेच आढळून आले होते. सर्वांच्याच मानवी हक्काच्या प्रस्थापनेसाठी दिलेला लढा हा फार मोठा स्वातंत्र्याचा लढा असतो.संविधान निर्मितीच्या प्रक्रियेतून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला पूर्णत्व प्राप्त झालेले दिसते.या संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वात मोठे योगदान दिलेले आहे. म्हणूनच आपण बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय संविधानाचे शिल्पकार असे म्हणतो.राजकीय आणि सामाजिक लढ्यातील नेत्यांनी नव्या भारत या राष्ट्राच्या संदर्भामध्ये जी स्वप्ने पाहिलेली होती,ती स्वप्ने साकार करू शकणारी राज्य यंत्रणा देणारे संविधान भारताला हवे होते.असे संविधान निर्माण करण्याचे काम सहज सोपे नव्हते.कारण विविधतेने नटलेल्या आणि फाटलेल्या भारतीयांना एकजीव करायचे होते. परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या भारतीयांना समजावून सांगायचे होते. समाधानी करायचे होते. नवे राष्ट्र घडवणाऱ्या व्यवस्थेबद्दल सर्वांचे एकमत घडवून आणायचे होते.सरंजामदारी संपवायची होती.लोकशाही रुजवायची होती. शोषण आणि विषमता संपवायची होती. समता प्रस्थापित करायची होती.अंधश्रद्धा मिटवायची होती. बुद्धिवाद विज्ञान रुजवायचा होता.दारिद्र्य बेकारी उच्चनीचता संपवायची होती. सर्वांना सुख शांतीचे आणि सन्मानाचे जीवन द्यायचे होते. त्यासाठी परंपरेने चालत आलेल्या साऱ्या साऱ्या कुप्रथा संपवायच्या होत्या.नव्या न्याय,स्वातंत्र्य,समता,बंधुतावादी, बुद्धिवादी विज्ञानवादी परंपरा निर्माण करायच्या होत्या. तोडणाऱ्या प्रवृत्ती संपवून समग्र भारतीयांना जोडणारे पक्क असे नव्हे रेशीम धागे निर्माण करायचे होते. बाबासाहेबांनी हे सारे साध्य करण्यासाठी संविधान निर्मितीच्या कार्यात प्रचंड मोठे बौद्धिक परिश्रम केले.

सायमन कमिशनला निवेदन देऊन प्रौढ मताधिकाराच्याद्वारे विधिमंडळातील सदस्यांची निवड करावी,अल्पसंख्य आणि शोषित समूहां साठी राखीव जागा ठेवाव्यात अशी मागणी बाबासाहेबांनी केली.मोतीलाल नेहरू यांनी तयार केलेला भारताच्या भावी संविधानासंदर्भातला अहवाल देशातील अस्पृश्य शोषितांच्या हक्कांची व संरक्षणाची आवश्यक ती व्यवस्था करत नाही म्हणून त्याबद्दल असमाधान व्यक्त केले. भारताच्या भवितव्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी ब्रिटिशांनी १९३०,३१ व ३२ मध्ये गोलमेज परिषदा घेतल्या. या परिषदांमध्ये उपस्थित राहून त्यांनी भारताच्या भवितव्याबद्दल, विशेषतः अमानुष अशा अस्पृश्यतेचे बळी ठरलेल्या वर्गाच्या मानवी हक्कांबद्दल गंभीर असे चिंतन प्रकट केले. अस्पृश्यांना न्याय मिळवून देणारे त्यांचे खरे प्रतिनिधी विधिमंडळात निवडून जावेत म्हणून त्यांच्यासाठी विभक्त मतदार संघाची मागणी केली.

ब्रिटिश प्रधानमंत्री रेन्से मॅकडोनाल्ड यांनी ८ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा करून त्यात मुसलमान, युरोपियन, ख्रिश्र्चन यांच्यासाठी विभक्त मतदार संघ जाहीर केले. त्याचबरोबर अस्पृश्यांसाठी राखीव जागा आणि विभक्त मतदार संघ देण्यात आले. अस्पृश्यांना विक्त मतदार संघ देण्याच्या निर्णयाविरुद्ध गांधीजींनी पुण्याच्या येरवडा तुरुंगात आमरण उपोषण केले. गांधीजींच्या हट्टामुळे पुणे करार करून बाबासाहेब आंबेडकरांना राखीव जागांवर समाधान मानत संयुक्त मतदार संघास मान्यता द्यावी लागली. यामुळे अस्पृश्यांचे स्वाभिमानी व स्वतंत्र विचाराची खरे प्रतिनिधी विधिमंडळात जाण्यात खूप मोठा अडथळा निर्माण झाला.१९४५ साली इंग्लंडमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मजूर पक्ष सत्तेवर आला त्यावेळी भारतातील व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी भारतात देखील सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे घोषीत केले. स्वतः स्थापन केलेल्या ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशन या पक्षाची अनेक उमेदवार बाबासाहेब आंबेडकरांनी या निवडणुकीत उभे केले. पण बहुतांश उमेदवार पराभूत झाले. प्रांतिक विधीमंडळाचे सदस्य भावी संविधान समितीमध्ये प्रतिनिधि म्हणून निवडले जाणार होते.

**(पान ३ वर) ...**

## हनुमंता ...

फाडूनि छाती दावी
श्री राम वसतो ठाई
लाभले शाश्र्वतस्थान
तयाला प्रभुच्या पाई

शक्तीची मस्ती नको
माज भीमाचा जाई
वानर सेना संघटना
काय सांगू चतुराई

संजीवनी वनस्पती
द्रोणागिरीच्या ठाई
पुन्हा स्थापी पर्वता
वाचवलीस वनराई

जळेलंका वाजेडंका
दानवा आठवे आई
थरथरे विश्र्व अवघे
पळताना थोडी भुई

रे प्रात: संध्यासमयी
राम रक्षा नीत गाई
नमस्कार करी रामा
हाक रामापर्यंत जाई

भक्तीच्या चार कोई
फुले भली आमराई
उपकृत करे जगता
होणार कशी उतराई

## हनुमान जयंती..

यंदा नवशामारूतीला
तैलाभिषेक ना केला
तेल तेचं झोपडपट्टीत
वाटून येई गृहिणीला

नैवेद्य दाखवून केवळ
कवळ देई भुकेल्याला
महाप्रसाद वाटत राहे
रे आलेल्या गेलेल्याला

नारळांचे पाणी गोड
पाजले पिपासिताला
आधार दे निराधाराला
शब्द गोड दु:खीताला

दक्षिण पेटी भरली ना
दानदिव्यांग गरीबाला
वस्त्रदान किती जणां
औषधे दिली रुग्णाला

हात जोडी हनुमंताला
तेल थोडेसे पणतीला
जरा वेगळा वागे यंदा
या हनुमान जयंतीला

एक मागणे करी तुला
दानत द्या या हाताला
पुन्हा मागे अजून एक
कळू नये त्या हाताला

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

लातूर, - येथील राजमाता



जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज व संगमेश्वर विद्यामंदिरात शुक्रवारी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य केंद्रे यांनी, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह अन्य प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक व्यक्ती नसून एक विचार आहे !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन म्हणजे भारतीय जनतेच्या न्याय व समतेसाठी लढयाची अविस्मरणीय गाथाच होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्र्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्र्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. तीच त्यांनी संविधानेत साकारली जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगितला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.



स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेपुढे कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मिक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना (कायदामंत्री) असतांना शेडयुल्ड कास्ट फेडरेशन काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत निष्ठा जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले गेले पाहिजे. त्याला कारण ही तसेच! ते म्हणाले, मी प्रथम भारतीय आणि शेवटपर्यंत भारतीयच! अशा महान विद्यात्याला वगळून खरोखरच हा देश मोठा झाला असता काय? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र-शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. त्यांच्या ठायी असलेल्या अर्थकारणामुळे भारतीय रिजर्व्ह बँक उदयास आली, हे ही विसरुन चालणार नाही. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत. ही त्यांच्या विद्वत्तेची पावती म्हणावी लागेल, जी जगमान्य ठरली. कितीतरी विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयावर डॉक्टरेट मिळविणाऱ्यांची संख्या ज्याची मोजदाद करता येणार नाही. त्यामुळे त्यांच्या विद्वत्तेची प्रचिती लक्षात येते.

डॉ. बाबासाहेबांनी बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचे कडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडील आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला.

पुढील शिक्षणासाठी बडोद्याचे प्रागतिक राजे सयाजीराव गायकवाडांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. पैसा जमवला व १९२० साली ते अपुरा अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळया ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे. १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी होय. त्यानंतर त्यांनी निरनिराळया विषयांवर दोन-तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी दिली.

सामाजिक समतेसाठी त्यांनी महाडच्या तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले. प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली. तसेच नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. अन् त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. लगेच त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमकी विधायक आणि व्यापक भूमिका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वत: हुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली.

आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते. चले जाव चा नारा देऊन इंग्रजांना देश सोडावा लागला आणि नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. तेव्हा पं. जवाहरलाल नेहरुं व महात्मा गांधीनी ही जबाबदारी बॅरि. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली.

डॉ. बाबासाहेबांनी त्यांनी अहोरात्र जिद्द व चिकाटीने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता त्यांनी अहोरात्र प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. दलित वर्गाचे पुढारी एवढ्या पुरतीच त्यांची भारतीय मान्यता नसून भारतीय स्वराज्यातील पहिले कायदेमंत्री पद त्यांना देण्यात आले. कायदा व घटनाशास्त्राचा त्यांचा गाढ अभ्यास हा त्यांच्या जीवनाचा एक स्वतंत्र पैलू होता. १९५० पासुन राज्यघटना अंमलात आली. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळे भारताला जगात नावलौकिक मिळाले, असे म्हटले तर अतिश्योक्ती होणार नाही. तेव्हापासुनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्र्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही आणि एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू 'भारतीय' हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे. तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही, दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे, म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक तत्वज्ञानांचा तसेच सामाजिक/राजकिय संघर्षाचा वारसा लाभलेला असल्यामुळे हा समुह मूळत: प्रस्थापित विरोधी आहे, त्यांचा हिंदु धर्मातील पाखंडी संताना विरोध होता. भारत देशावर मात्र त्यांचे अलोट प्रेम होते, त्यामुळे हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मतानुसार धर्माच्या कसोटीवर उतरणारा एकमेव धर्म आहे, तो म्हणजेच बुद्धधम्म होय. तेव्हा आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्र्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु, कारण या धर्माचे लोन जागतिक पातळीवर उंचावले आहे. भारताच्या अलिकडील इतिहासात त्यांची कामगिरी उच्च श्रेणीची व चिरस्मरणीय अशीच आहे. अन ती दिवसेंदिवस वाढतच जाणारी आहे, हे त्यांच्या प्रखर विद्वत्वत्तेमुळे!

बाबासाहेब म्हणजे महान चारित्र्यवान व्यक्ति, अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, इतिहासाचे विद्वान, अभ्यासक, बुध्दिमान, कायदेपंडीत, स्मृतीकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक, ग्रंथकार, निधडया छातीचा व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, भगवान बुध्दांच्या कार्याचा संदेश सर्व जगात पसरविणारा, पददलितांचे स्फूर्ती व आशास्थान अशा या जागतिक कीर्तीच्या महामानवाला १३४ व्या जयंती निमित्त मानाचा मुजरा!

ज्ञानपिपासू युगांधराच्या आठवणींना स्मरू ।
मिळून आपण सारे साजरी भीम जयंती करू ।।

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**
**ई-मेल : र्पिंळपलरसवशसारळश्र.लो**

## तालुकास्तरीय पथकाकडून जिल्हा परिषद शाळांच्या भौतिक सुविधेचे निरीक्षण

भोकर (प्रतिनिधी) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ



या पथकाकडून तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांना भेटी देऊन भौतिक सुविधांची पाहणी केली जात असून शाळेला पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध आहेत का? योग्य इमारत आहे की नाही? शाळेतील पिण्याच्या पाण्याची स्थिती, स्वच्छतागृहांची स्थिती, शाळेच्या परिसरात गैरप्रकार ? शाळेला कुंपण भिंत आहे का? याबाबत निरीक्षण केले जात आहे.

भोकर तालुक्यात स्थानिक प्राधिकरणच्या १२५ शाळा असून या सर्व शाळांना भेटी देण्यासाठी तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या मार्गदर्शनात नियोजन करण्यात आले असून तहसीलदार विनोद गुंडमवार, गटविकास अधिकारी केंद्रे, पोलिस निरीक्षक अजित कुंभार,गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता जायभाये, शिक्षण विस्ताराधिकारी सुमन गोणारकर, केंद्र प्रमुख वी.रा.शिंदे, लक्ष्मण सुरकार आदींच्या पथकाकडून दि. ०८ एप्रिल पासून शाळा भेटी सुरू केल्या आहेत. भोसी व देवठाण केंद्रातील सुमारे ३० शाळांना भेटी देऊन भौतिक सुविधांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले आहे.

या शाळाभेटीत तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी शाळेतील प्रत्येक गोष्टीचा बारकाईने निरीक्षण करून शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांचा आढावा घेतला आहे.यावेळी गावकरी , लोकप्रतिनिधी यांना शाळांप्रती संवेदनशीलता दाखवण्याचे अवाहन केले. अनेक शाळेतील गुणवत्ता, शालेय परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी, शिस्त पाहून समाधान व्यक्त केले आहेत. पोलिस निरीक्षक अजित कुंभार यांनी शाळेच्या परिसरात होत असलेले गैरप्रकारावर आळा घालण्यासाठी कायदेशीर मार्गदर्शन केले. या पथकाकडून शाळांची पाहणी करून वास्तव परिस्थिती शासनास कळविली जाणार असल्यामुळे भविष्यात शाळेला फायदा होईल या आशेने पालकवर्गात मात्र समाधान व्यक्त होत आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १३ एप्रिल रोजी जय भीम पदयात्रा

लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती १४ एप्रिल २०२५ रोजी साजरी होत आहे. या पार्श्र्वभूमीवर १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा प्रशासनाच्यावतीने जय भीम पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. दयानंद महाविद्यालय मैदान येथून लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या उपस्थितीत जय भीम पदयात्रा सुरू होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर पदयात्रेचा समारोप होईल.

लेझीम पथक, झांज पथकासह भीम गीतांचा कार्यक्रम यावेळी आयोजित केला जाणार आहे. यासोबतच एनसीसी, एनएसएस, नेहरू युवा केंद्र, भारत स्काऊट अँड गाईडसह विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांचा या पदयात्रेत सहभागी होणार आहेत, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी दिली आहे.

### अमृत भारत स्टेशन (पान १ वरुन) :

मनमाड (४५ कोटी), नगरसोल (२०.३ कोटी), नांदगाव (२० कोटी), आमगाव (७.८ कोटी), वडसा (२०.५ कोटी), हातकंनगले (६ कोटी), हिमायतनगर (४३ कोटी), हिंगोली डेक्कन (२१.५ कोटी), किनवट (२३ कोटी), चाळीसगाव (३५ कोटी), अंमळनेर (२९ कोटी), धरणगाव (२६ कोटी), पाचोरा जं. (२८ कोटी), दिवा (४५ कोटी), मुंब्रा (१५ कोटी), शहाड (८.४ कोटी), कोल्हापूर - छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (४३ कोटी), लातूर (१९ कोटी), जेऊर (२० कोटी), कुर्डूवाडी जं (२० कोटी), फलटण (१ कोटी), वाठर (८ कोटी), आकुर्डी (३४ कोटी), चिंचवड (२०.४ कोटी), देहू रोड स्टेशन (८.०५ कोटी), तळेगाव स्टेशन (४०.३४ कोटी), मालाड स्टेशन (१२.३२ कोटी), कुर्ला जं. स्टेशन (२८.८१ कोटी), कांजुरमार्ग स्टेशन (२७ कोटी), विद्याविहार स्टेशन (३२.८ कोटी), विक्रोळी स्टेशन (१९ कोटी), जोगेश्र्वरी स्टेशन (११९ कोटी), माटुंगा स्टेशन (१७.३ कोटी), परळ स्टेशन (१९.४ कोटी), प्रभादेवी (२१ कोटी), वडाळा स्टेशन (२३ कोटी), भोकर स्टेशन (११.३ कोटी), धर्माबाद स्टेशन (३० कोटी), मुखेड जं.स्टेशन (२३ कोटी), उमरी स्टेशन (८ कोटी), देवळाली स्टेशन (१०.५ कोटी), इगतपुरी स्टेशन (१२.५ कोटी), धाराशिव स्टेशन (२२ कोटी), गंगाखेड स्टेशन (१६ कोटी), मनवथ रोड स्टेशन (१२ कोटी), परभणी जं. स्टेशन (२६ कोटी), इत्यादी...

# आधुनिक भारत आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर!

**(पान २ वरुन)** : मुंबई प्रांताच्या विधिमंडळात बाबासाहेबांच्या पक्षाचे सभासद नव्हते. पण बंगालच्या विधिमंडळात त्यांच्या पक्षाचे प्रतिनिधी असल्यामुळे बंगालच्या विधिमंडळातून बाबासाहेब आंबेडकरांची संविधान समितीवर निवड झाली. भारताच्या फाळणीनंतर बंगालमधील बाबासाहेबांचा मतदार संघ पाकिस्तानात गेला त्यामुळे त्यांचे संविधान

सभेमधील सभासदत्व संपुष्टात आले.१९४७ पूर्वी संविधान सभेमध्ये झालेल्या कामकाजातील बाबासाहेबांचा सहभाग हा अत्यंत सक्रिय स्वरूपाचा होता. वर्तमानात जात धर्मांधतेने सुटलेल्या भारताचे एकात्म असे नवे राष्ट्र घडवण्याच्या संदर्भात१७ डिसेंबर १९४६ रोजी त्यांनी आपल्या भाषणात अत्यंत प्रभावी असे चिंतन प्रकट केले होते. नवे राष्ट्र घडवण्यासाठी, तात्त्विक,मूल्यात्मक, राज्य, समाज अर्थव्यवस्थात्मक मार्गदर्शन करणारे संविधान घडवण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहभाग असणे अपरिहार्य आहे हे संविधान सभेतील सर्वांच्याच लक्षात आले होते. त्यामुळे काँग्रेसलाच बाबासाहेब आंबेडकरांना मुंबई प्रांतातून संविधान सभेवर निवडून आणावे लागले. संविधान सभेच्या विविध उपसमित्यांमध्ये डॉ. आंबेडकरांनी अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे काम केले होते म्हणून एकूण संविधानसभेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विधीतज्ञतेचा, बुद्धिमत्तेचा व एकात्म नवराष्ट्र घडणी विषयीच्या दूरदृष्टीचा फार मोठा प्रभाव पडला होता.२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील नेते आणि कार्यकर्त्यांनी पाहिलेले स्वतंत्र भारताच्या संदर्भातले स्वप्न सातारा करण्याच्या कायदेशीर, तात्त्विक,मूल्यात्मक, धोरणात्मक दिशा देणारे संविधान निर्माण करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान सर्वो च्च पातळीवरचे होते. हे योगदान बहुतांशाने एकहाती स्वरूपाचे होते. बाबासाहेबांनी केल्या संविधान निर्मितीच्या कार्या त्यांचा गौरव करताना संविधान सभेतील एक महत्त्वाचे सदस्य टी. टी. कृष्णम्माचारी यांनी असे म्हटले आहे,या सभागृहाने मसुदा समितीवर ज्या सात सदस्यांची नियुक्ती केली होती त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला म्हणून त्यांच्या जागी दुसऱ्यांना नियुक्त करण्यात आले. एका सदस्याचा मृत्यू झाला आणि ती जागा रिकामीच राहिली. एक सदस्य दूर अमेरिकेत निघून गेले आणि त्यांचीही जागा भरली गेलीच नाही. दुसरे एक सदस्य राज्याच्या राजकारणात व्यस्त होते, गुंतलेले होते आणि त्या प्रमाणात पोकळी निर्माण झाली होती. एक किंवा दोन सदस्य दिल्लीपासून फार दूर होते आणि कदाचित प्रकृती स्वास्थ्याच्या कारणास्तव त्यांनी बैठकीत भाग घेतलाच नाही. याचा अंतिम परिणाम असा झाला की या संविधानाचा मसुदा तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर आली आणि त्यांनी हे महत्त्वपूर्ण निसंशय अत्यंत समर्थपणे पूर्ण केले यात तिळमात्र शंका नाही याकरिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत.

भारताचे पहिले राष्ट्रपती आणि संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद म्हणाले, विशेषतः या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांनी आपल्या प्रकृतीची क्षिती न बाळगता ते काम तडीस नेले आहे.घटना समितीच्या मसुदा समितीवर डॉ. आंबेडकर यांची निवड करण्यात आली तिच्या अध्यक्षपदी निवड करण्याचा जो निर्णय घेतला त्याच्याइतका अचूक निर्णय घटना समितीने दुसरा कोणताही घेतला नाही. आंबेडकरांनी आपल्या निवडीची यथार्थता पटवून दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी जे कार्य केले त्याला त्यांनी एक प्रकारचा तेजस्वीपणा आणला. वरील दोन्ही मान्यवरांच्या विधानांवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला संविधान निर्मितीच्या माध्यमातून पूर्णत्व देण्यासंदर्भातील कार्य किती मोलाचे आहे हे लक्षात येईल.

भारतीयांच्या हातात राजकीय सत्ता सोपवून इंग्रज भारतातून निघून गेल्यामुळे आपला राजकीय स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला,परंतु सामाजिक स्वातंत्र्याचा लढा मात्र अजूनही पूर्णपणे यशस्वी झालेला नाही.कारण सामाजिक स्वातंत्र्याचा लढा हा आपल्याच देशात अस्तित्वात असलेल्या अमानुष प्रवृत्तींच्या विरुद्धचा लढा आहे. आपल्या देशाच्या नवराष्ट्र निर्मात्यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वांना सामाजिक स्वातंत्र्य देण्यासाठीच्या कायदेशीर तरतुदी केल्या.परंतु धर्माच्या नावाने चालणाऱ्या व अमानवी रुढी-परंपरांचा,नाटक विषमतावादी कायद्यांचा अजूनही जनमानसावर मोठा प्रभाव आहे भारतातील सारे लोक अजूनही भारतामध्ये केवळ भारतीय म्हणून आणि केवळ माणूस म्हणून परस्परांशी सारे व्यवहार करत नाहीत.हे सारे करायचे असेल तर आपणाला निसर्गतः माणसात जी नसतेच,पण काही स्वार्थी प्रवृत्तींनी जी निर्माण केली आणि पिढ्यानपिढ्या टिकवली अशी माणसाला माणसापासून तोडणारी जातिव्यवस्था नष्ट करावी लागेल. सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा नष्ट कराव्या लागतील. भारतीय जनमानसात स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, सेक्युलॅरिझम, बुद्धिवाद, विज्ञानवाद, सत्य, शांती,अहिंसा,सहकार,राष्ट्र सेवा निस्पृहता यासारखी सांविधानिक मूल्ये रुजवावी लागतील.

!!..धन्यवाद..!!

**हरिदास भिसे पुणे.९९२३७४२३७२**

# फ्रीजरमध्ये का तयार होतो बर्फाचा डोंगर? ४ प्रकारे दुरुस्त करा, आणि तुमच्या फ्रीजचे आयुष्य वाढवा

हिवाळा संपत आला आहे, आता थंडीचे



१५ ते २० दिवस उरले आहेत. यानंतर उन्हाळा आणि नंतर पावसाळा येईल. या ऋतूमध्ये घरात सध्या रेफ्रिजरेटरचा सर्वाधिक वापर केला जातो. ज्यामध्ये तहान शमवण्यासाठी पाणी थंड केले जाते आणि अन्न आणि भाज्या ताज्या ठेवल्या जातात.

परंतु काही लोक त्यांच्या रेफ्रिजरेटरच्या फ्रीजरमध्ये साचलेल्या बर्फाच्या पर्वतांमुळे त्रासलेले असतात. ज्या फ्रीजचा कमी वापर केला जातो त्या फ्रीजमध्ये बऱ्याचदा बर्फाचे डोंगर साचतात. जर तुम्हालाही अशीच समस्या भेडसावत असेल, तर आम्ही तुम्हाला रेफ्रिजरेटरमधील थंडीच्या डोंगरापासून कशी सुटका मिळवू शकता ते सांगणार आहोत.

वारंवार उघडू नका फ्रीज

जर तुमच्या फ्रीजरमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त बर्फ साठवला जात असेल, तर कदाचित त्यात जास्त आर्द्रता आहे. फ्रीजमध्ये ओलावा जाण्यापासून रोखण्यासाठी दिवसा किमान फ्रीज उघडा. वास्तविक, जेव्हा तुम्ही फ्रीज उघडता, तेव्हा आतमध्ये गरम हवा जाते, जी आतल्या थंड हवेशी संयोग होऊन ओलावा निर्माण करते आणि नंतर तिचे बर्फात रूपांतर होते.

फ्रीजर योग्य तापमानावर सेट करा

जर तुमच्या फ्रीजरमध्ये खूप बर्फ जमा होत असेल तर त्याचे तापमान -१८ डिग्री फॅरेनहाइट सेट करा. तुमचे फ्रीझर या तापमानापेक्षा वर सेट केले असल्यास, ते खाली करा. अन्यथा, फ्रीजमध्ये अधिक बर्फ जमा होण्यास सुरवात होईल.

फ्रीजरमध्ये जास्त सामान ठेवा

फ्रीझरमध्ये बर्फ तयार होण्यापासून रोखण्यासाठी, ते अधिक वस्तूंनी भरलेले ठेवा. वास्तविक, फ्रीजरमध्ये जितकी जास्त जागा असेल तितकी जास्त आर्द्रता त्यात निर्माण होते, जी कालांतराने थंड किंवा बर्फात बदलते.

डीफ्रॉस्ट ड्रेन स्वच्छ करा

बहुतेक रेफ्रिजरेटर्सच्या पृष्ठभागावर एक ट्यूब असते, जी पाणी काढून टाकते. अशा परिस्थितीत जर हा पाईप जाम झाला, तर तुमच्या रेफ्रिजरेटरमध्ये बर्फ जमा होऊ शकतो. हे टाळण्यासाठी, ते नियमितपणे स्वच्छ करणे आणि घाण काढून टाकणे आवश्यक आहे.

# भाडे करार करताना करू नका या ८ चुका

तुम्हीही घर भाड्याने घेणार असाल, तर भाडे करार करताना काही गोष्टींची विशेष काळजी घ्यावी. घर भाड्याने देण्यासाठी किंवा घेण्यासाठी, तुम्हाला भाडे करार करणे आवश्यक आहे. जर तुमचा करार झाला नाही, तर तुम्ही पुढे जाऊन अडचणीत येऊ शकता. या करारामध्ये भाडेकरू आणि घरमालक यांच्या अटी



लिहिल्या आहेत. ज्यावर दोन्ही पक्षांनी सहमती दिल्यानंतर स्वाक्षरी करावी लागते.

ज्यामध्ये भाडेवाढ, दुरुस्ती व देखभाल व इतर देयकांची माहिती लिहिली असते. चला, भाडे करार करताना कोणत्या ८ चुका करू नयेत ते आम्ही तुम्हाल सांगतो.

करू नका या ८ चुका

चुकीचे भाडेकरू टाळा – घर किंवा कोणतीही मालमत्ता भाड्याने देण्याआधी, भाडेकरूबद्दल सखोल संशोधन करा. चुकीच्या भाडेकरूला घर भाड्याने दिल्याने तुम्हाला दीर्घकाळ अडचणी येऊ शकतात.

सुज्ञपणे ठरवा भाडे – तुमच्याकडे घर असल्यास, तुम्ही त्याच्या देखभालीवर खर्च केला असेल. अशा परिस्थितीत, तुमच्या भाडेकरूनेही या गोष्टी व्यवस्थित ठेवाव्यात याकडे तुम्ही लक्ष दिले पाहिजे आणि त्यानुसार तुम्ही भाडेही निश्चित केले पाहिजे.

व्यावसायिक पद्धतीने सेट करा भाडेकरू – भाडेकरू हा छंद नाही, तो एक व्यवसाय आहे. म्हणून आपण ते योग्यरित्या केले पाहिजे. यासाठी तुम्ही योग्य पद्धतीने भाडेकरार केल्यानंतरच मालमत्ता भाडेकरूच्या ताब्यात द्या.

भाडेकराराची वेळ– कायदेशीररीत्या सामान्य भाडेकरू ११ महिन्यांची असते. ती वेळ तुम्ही हुशारीने ठरवावी.

समाप्ती आणि सूचना– जर भाडेकरू करारात दिलेल्या अटींचे पालन करत नसेल तर, घरमालक त्याला मालमत्ता रिकामी करण्यास सांगू शकतो आणि करार संपुष्टात आणू शकतो. त्याचबरोबर भाडेकरू आणि घरमालक यांना घर रिकामे करण्यासाठी नोटीस म्हणून एक महिन्याची मुदत द्यावी लागेल.

लॉक-इन कालावधी– या स्थितीत घरमालक भाडेकरूला माहिती न देता शहराबाहेर मालमत्ता सोडू देत नाही. म्हणजेच भाडेकरूला घर रिकामे करून दुसऱ्या शहरात जायचे असेल, तर घरमालकाला त्याची आधीच माहिती द्यावी लागते.

पेमेंट– भाडे भरण्यासाठी घरमालकाला एक निश्चित तारीख निश्चित करावी लागते. त्याच तारखेला भाडेकरूने घरमालकाला भाडे द्यावे लागेल.

डिफॉल्ट क्लॉज– या नियमांतर्गत जमीन मालक स्वत:च्या अटी आणि दंड स्वत: ठरवू शकतो.

# राशिभविष्य १२ एप्रिल २०२५

मेष : शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: पश्चिम

व्यापारात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे आजचा दिवस धावपळीत जाणार आहे. मेहनतीच्या मानाने आज कमी आवक राहणार आहे. खर्च कमी करा. मुलांच्या व्यवहारामुळे मानसिक तणाव राहील.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर

आपल्या बुद्धी चातुर्याने समस्या दूर होतील. सुख समृध्दीत वाढ होईल. उतावेळपणा करू नका. वाचनाची गोडी वाढेल. प्रवास करण्याचे शक्यतो टाळा.

मिथुन : शुभ रंग: काळा,शुभ दिशा: दक्षिण

नवीन योजना कार्यान्वयीत होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहणार आहे. आर्थिक आवक वाढेल परंतु जास्त अपेक्षा धरू नका. व्यापारात फायदा मिळण्याची परिस्थिती निर्माण होईल.

कर्क : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण

वरिष्ठ लोकांमध्ये मान सन्मान मिळेल. बुद्धी चातुर्यामुळे कामात यश मिळेल. नवीन गुंतवणूक करण्याचे योग आहेत. आपल्या व्यसनांवर नियंत्रण ठेवा.

सिंह : शुभ रंग: लाल,शुभ दिशा: उत्तर

व्यवहारा कुशलतेमुळे आधिकारी वर्गाकडून स्तुती होईल. आर्थिक लाभ मिळेल. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मुलांच्या आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.

कन्या : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा : उत्तर

मित्र, शुभचिंतकाची भेट होईल. आई वडिलांच्या प्रकृतीची काळजी घ्या. गृहपयोगी वस्तू खरेदी करण्याचे योग आहेत. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

तुळ : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: उत्तर

अडकलेली कामे पूर्ण होण्याचे योग आहेत. मान प्रतिष्ठा सन्मान मिळणार आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर

व्यावसायीक किंवा कौटुंबिक समस्यांचे समाधान होईल. कौटुंबिक चिंता दूर होईल. कोणाचाही द्वेष करू नका. विद्यार्थ्यांना परिक्षेत अपेक्षीत यश मिळेल.

धनु : शुभ रंग :केसरी,शुभ दिशा:उत्तर

व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल.खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढीस लागेल.व्यापार चांगला चालेल.

मकर: शुभ रंग लाल, शुभ दिशा: पश्चिम

आर्थिक स्थिती मजबूत होईल. मुलांच्या आरोग्याची चिंता मिटणार आहे. काही नवीन योजना बनवताल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वाहन सुख मिळेल.

कुंभ : शुभ रंग :निळा, शुभ दिशा :पश्चिम

वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात लक्ष घालावे लागेल. वेळेवर निर्णय न घेतल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. धार्मिक भावना वाढीस लागेल.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम

विचार पूर्वक काम केल्यास आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. व्यवसाया निमित्ताने झालेला प्रवास लाभदायक राहील. मुलांच्या कामाबल आनंदी रहाल.

# (गुरु वचन) सर्वांमध्ये प्रिती तत्व – ओशो

आपल्या प्रत्येकात 'प्रिती' नावाचे तत्व आहे, ज्याच्या आधारावर आपण जगतो. आपण चुक जगत असलो तरी 'प्रिती'च्या आधारावर जगत असतो.

पैसे कमावणाऱ्याची पैशांवर प्रिती असते. कुणी पदाच्या मागे धावत असेल पद गौण आहे पण प्रतिष्ठेवर प्रिती आहे. जिथे शोधाल तिथे तुम्हाला प्रिती सापडेल. कुणी वेश्यालयात गेले व एखाद्याने कुणाची हत्या केली. पापी माणसात व पुण्यात्मातही तुम्हाला प्रिती एकसाथ पाहण्यास मिळेल. मग प्रिती कुणासोबत झाली, त्याचे प्रकार पडतात. पैशावर लागली तर तुम्ही पैसेच होऊन जातात. कागदाच्या सडक्या नोटा होऊन मरतात.

हे मोठे पायाभूत सत्य आहे, यास हृदयात सांभाळून ठेवा. प्रिती महागडा सौदा असल्याने कुणासोबतही करु नका. प्रितीचा अर्थ – मी हे होऊ इच्छितो, असा होतो. राजनेता गावात आले व तुम्ही एकत्र जमून त्यांचे स्वागत केले. का केले? कारण तुमची इच्छा असते की, माझ्याकडेही पद असावे, प्रतिष्ठा असावी म्हणून पद व प्रतिष्ठेची पूजा आहे. एखादा भिकारी गावात आला व तुम्ही पोहोचले. त्याच्यासोबत तुमची प्रिती असल्याचे वृत्त मिळते की, भिकारी होण्यासाठी आतूर आहेस-कधी येईल तो मुक्तीचा क्षण, जेव्हा सर्व सोडून...कुठल्याही वस्तूवर माझी पकत्रड राहणार नाही. कुणी संगीत ऐकले तर हळुहळु त्याच्या हालचालीत संगीत दिसू लागते. तुम्ही ज्यावर प्रिती कराल तसे व्हाल.

प्रिती तत्वात रसायन असून प्रितीशिवाय कुणी राहू शकत नाही. प्रिती श्वासाप्रमाणे गरजेची आहे. जसे शरीर श्वासावर जगते, आत्मा प्रितीवर जगतो म्हणून जर तुमच्या जीवनात प्रिती नसेल किंवा तुमचा प्रितीचा सेतू तुटेल तेव्हा तुम्ही आत्महत्या कराल. घरास आग लागली व सर्व पैसे जळाले आणि तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, हे घरच मी होतो व हेच माझी प्रिती होती. आता हेच नसल्यावर माझ्या राहण्यास काय अर्थ! तुमची पत्नी मरण पावली व तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, तिच माझ्या प्रितीचा आधार होती. माझा संसार उद्ध्वस्तच झाला. आता माझा जगून काही उपयोग नाही.

आपण प्रितीशिवाय जगू शकत नाही. जसे श्वासाविना शरीर राहत नाही तसे प्रितीविना आत्मा राहत नाही. मग चुकीने प्रिती झाली तरी आत्मा टिकून राहते.

प्रितीचे अनेक प्रकार लक्षात घेतले पाहिजे. एक प्रिती जी तुमच्या पत्नीवर असते, मित्रांवर असते, पतीवर असते, भाऊ-बहिणीत असते. त्या प्रितीला आपण प्रेम संबोधतो.

आणखी एक प्रिती असते. जी आई-वडिल किंवा गुरुंप्रती असते, त्यास श्रद्धा म्हणतात. कुणी तुमच्यापेक्षा मोठे आहे. प्रितीला डोंगरावर चढावे लागते म्हणून श्रद्धा कठीण असते. श्रद्धेत डाव खेळावा लागते. श्रद्धेत चढाई असल्याने फार कमी लोकांमध्ये पाहण्यास मिळते. आई-वडिलांवर कोण प्रिती करतो! लोक कर्तव्य पार पाडताना दिसतात. मग प्रिती कुठे गेला? आपल्यापेक्षा मोठ्यांवर प्रिती करण्यात डोंगर चढण्याची हिम्मत असायला हवी व लक्षात ठेवा की, तुम्ही आपल्यापेक्षा मोठ्यांवर जेवढी प्रिती कराल तेवढे तुम्ही वर जाल. तुमच्या चेतना ऊर्ध्वगामी होतील म्हणून आम्ही श्रद्धेला खुप महत्व देतो. श्रद्धा माणसाला बदलते.

ज्याच्या जीवनात श्रद्धा नाही त्याच्या जीवनात विकास नसतो.

आपल्यापेक्षा छोट्यांवर असलेल्या प्रितीस स्नेह म्हणतात. छोट्यांप्रती सच्ची प्रिती तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपली मोठ्यांवर श्रद्धा असते. ज्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा मोठ्यांप्रती श्रद्धा आहे, सम्यक श्रद्धा आहे, त्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा छोट्यांप्रती सम्यक स्नेह असतो व त्या व्यक्तीच्या जीवनात आमुलाग्र बदल होतो-आपल्या समवयीनांप्रती सम्यक प्रेम असते. त्याच्या जीवनात प्रेमाचा छंद बांधला जातो.

# तीर्थक्षेत्र योजनेतील विकासकामे गुणवत्तापूर्वक आणि दर्जेदार करावीत आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचना निवळी, गातेगाव येथील कामाची पाहणी आणि ग्रामस्थांशी संवाद

लातूर – लातूर तालुक्यातील मौजे निवळी, गातेगाव बोरगाव काळे येथील विविध विकास कामाची पाहणी करून लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी



शुक्रवारी आढावा घेतला. सर्व विकासकामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्वक लवकरात लवकर पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी शुक्रवारी सकाळी लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथील श्री निळकंठेश्र्वर महादेव मंदिर परिसरात भक्तनिवास, परिसरातील रस्ते, विद्युतीकरण आणि मौजे गातेगाव येथील श्री राधाकृष्ण मंदिर आश्रम परिसरात भक्तनिवास सभामंडप संरक्षण भिंत यासह विविध कामासाठी राज्य शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत दोन्ही ठिकाणी प्रत्येकी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या निधीतून सुरू असलेल्या विकास कामाचा आढावा घेऊन पाहणी केली व समाधान व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधून विविध प्रश्र्नांची सोडवणूक केली. याप्रसंगी परमपूज्य विद्यानंदजी सागर महाराज, लातूर चे तहसीलदार सौदागर तांदळे, तालुका कृषी अधिकारी राऊत, जिप बांधकाम विभागाच्या उपअभियंता श्रीमती मोतीपवळे, वीज वितरण मंडळाचे उप अभियंता शेंडे, पोलीस अधिकारी उजगरे, यांच्यासह भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संगायोचे तालुकाध्यक्ष वैभव सापसोड, जिल्हा भाजपाचे विजय काळे, सुरज शिंदे, सरपंच अभय सोनपेठकर, गातेगाव सरपंच नागनाथ बनसोडे, उपसरपंच ज्ञानेश्र्वर जुगल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिर परिसरात होत असलेल्या विकास कामामुळे भाविकांना सोयी सुविधा मिळणार असल्याचे सांगून ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. रमेशआप्पा कराड यांनी या कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही दिली. यावेळी शेत रस्ते, पांदण रस्ते, सिंगल फेस डीपी, शेतीची २४ तास लाईट, पीकविमा, किसान सन्मान योजना, घरकुल यासह विविध प्रश्र्न ग्रामस्थांनी उपस्थित केले असता गरजू आणि पात्र एकही लाभार्थी शासनाच्या योजनेपासून वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे बोलून दाखवले.

मौजे बोरगाव काळे येथील ग्रामदैवत हनुमान मंदिर श्रीराम मंदिर भैरवनाथ मंदिर आणि ज्योतिबा मंदिर या देवस्थानांना भेटी देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी कामांची पाहणी केली. तत्पूर्वी बोरगाव काळे येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. विकास कामाची पाहणी आणि ग्रामस्थांशी संवाद दौऱ्याच्या निमित्ताने निवळी आणि गातेगाव येथील ग्रामस्थांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

यावेळी भाजपाचे प्रताप पाटील, विश्र्वास कावळे, गोपाळ पाटील, अशोक सावंत, विनायक मगर, आदिनाथ मुळे, काशिनाथ ढगे, शिवाजी अडसूळ, धनंजय जाधव, मल्हारी शिरसाट, बालाजी दुटाळ, बालाजी नाईकवाडे, राजाभाऊ शिंदे, गुणवंत पांचाळ, ज्योतीराम शिनगारे, शिवाजी जाधव, उद्धव रसाळ, दादा मायंदे, अर्जुन मांयदे, बाबासाहेब भिसे, काकासाहेब साखरे, सचिन लटपटे, बाळासाहेब कदम, प्रशांत शिंदे, राजाभाऊ ढोणे, नितीन पोतदार,शिवरुद्र चौंडे, राजाभाऊ डोंबे, दीपक बनसोडे, प्रदीप काळे,अमित जावळे यांच्यासह त्या त्या गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इतिहासात आजचा दिवस १२ एप्रिल २०२५

अंतरराष्ट्रीय

१६०६ – ग्रेट ब्रिटनने युनियन जॅकला आपला अधिकृत ध्वज म्हणून मान्यता दिली.

१८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेच्या सैन्याने चार्ल्स्टनजीकच्या फोर्ट सम्टरवर हल्ला केला व युद्धास तोंड फुटले.

१८६४ – अमेरिकन गृहयुद्ध-फोर्ट पिलोची कत्तल – जनरल नेथन बेडफोर्ड फॉरेस्टच्या नेतृत्त्वाखालील दक्षिणेच्या सैन्याने शरण आलेल्या उत्तरेच्या श्यामवर्णीय सैनिकांची कत्तल उडवली.

१८६५ – अमेरिकन गृहयुद्ध- उत्तरेच्या सैन्याने मोबिल, अलाबामा जिंकले.

१८७७ – युनायटेड किंग्डमने दक्षिण आफ्रिकेचा ट्रान्सव्हाल प्रांत बळकावला.

१९४५ – अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डिलानो रूझवेल्टचा अध्यक्षपदी असताना मृत्यु. उपाध्यक्ष हॅरी ट्रुमनची राष्ट्राध्यक्षपदी नेमणूक.

१९४६ – सिरीयाला फ्रांसपासून स्वातंत्र्य.

१९६१ – सोवियेत संघाचा युरी गागारिन अंतराळात जाणारा प्रथम माणूस झाला.

१९७५ – ख्मेर रूजने कंबोडियाची राजधानी फ्नॉम पेन्ह जिंकली.

१९८० – लायबेरियात लश्करी उठाव. सॅम्युएल डोने राज्यसत्ता हाती घेतली.

१९८१ – स्पेस शटल कोलंबियाचे सर्वप्रथम प्रक्षेपण.

१९९४ – युझनेटव सर्वप्रथम व्यापारिक स्पॅम ईमेल पाठवण्यात आली.

१९९८ – स्लोव्हेनियात रिश्टर मापनपद्धतीनुसार ५.६ तीव्रतेचा भूकंप.

२००२ – व्हेनेझुएलात ह्युगो चावेझविरुद्ध उठाव. पेद्रो कार्मोनाने तात्पुरते अध्यक्षपद घेतले.

२००८ – ब्रिटीश वृत्तपत्राद्वारे तरूण लेखकांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी भारतातील कामसूत्र या पुस्तकावर आधारित 'द बूक ऑफ लव्ह' या पुस्तकाचे नामांकन झाले.

राष्ट्रीय

१९९७ – भारताचे पंतप्रधान एच.डी.देवेगौडा यांचा राजीनामा.

२००६ – डान्सबार बंद करण्याचा निर्णय घटनाबाह्य असल्याचे मत व्यक्त करून मुंबई उच्च न्यायालयाने राज्यभरातील डान्सबारवर बंदी घालणारा महाराष्ट्र सरकारचा वटहुकूम रद्द केला.

२००७ – भारतातील सर्वात मोठी एयरलाइन जेट एयरवेजने एयर सहारावर १४५० कोटी रुपयांत वर्चस्व मिळवले.

जन्म

१५७७ – क्रिस्चियन चौथा, डेन्मार्कचा राजा यांचा जन्म.

१९०२ – लुई बील, नेदरलँडचा पंतप्रधान यांचा जन्म.

निधन

२३८ – गॉर्डियन पहिला, रोमन सम्राट यांचे निधन.

२३८ – गॉर्डियन दुसरा, रोमन युवराज यांचे निधन.

३५२ – पोप ज्युलियस पहिला यांचे निधन.

१९४५ – फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

१९६२ – सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता यांचे निधन.

१९८० – विल्यम आर. टॉल्बर्ट, जुनियर, लायबेरियाचा राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

# उपदेशकथा संकटांना तोंड द्या!

भारत भ्रमणाच्या काळात स्वामी विवेकानंद वाराणशीत आले असताना घडलेला हा प्रसंग. दुर्गामातेचे दर्शन घेऊन स्वामीजी परत चालले होते. रस्त्याच्या एका बाजूला पाण्याचा तलाव होता आणि दुसरीकडे एक उंच भिंत होती. स्वामीजी त्या रस्त्याने थोडे पुढे गेले तोच वानरांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. वाराणशीची वानरे दांडगट असतात. स्वामीजी घाबरून पळू लागले पण वानरे आणखी वेगाने त्यांच्या मागे लागली. त्यांच्या पायात आडवी येऊ लागली. चावे घेण्याचा प्रयत्न करू लागली. स्वामीजी पुरते गांगरले. रस्त्याच्या बाजूला बसलेल्या एका साधूने हा प्रकार पाहिला आणि तो स्वामीजींना ओरडून म्हणाला, पळू नका, वानरांकडे तोंड करा! त्यांचे म्हणणे ऐकून स्वामीजी उलटे फिरले आणि वानरांकडे तोंड करून उभे राहिले. त्याबरोबर ती वानरे घाबरून एकदम मागे सरली आणि नंतर पळून गेली. पुढे न्यूयॉर्कमध्ये एका सभेत स्वामीजींना हा प्रसंग सांगितला आणि मग ते म्हणाले, या प्रसंगातून मी आयुष्यातला एक फार मोठा धडा शिकलो, तो म्हणजे संकटांपासून पळून जायचे नाही तर त्यांना तोंड द्यायचे, त्यांच्याशी सामना करायचा?

कथा उपदेश : संकटाला घाबरून न जाता त्याच्याशी सामना करायला शिकले पाहिजे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या महाआरोग्य शिबिरास डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्कवर मोठा प्रतिसाद

लातूर-- सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजित साधून शुक्रवारी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात रक्तदान शिबिर व अवयव दान नोंदणी करण्यात आली या भव्य महाआरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी रक्तदान करून सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन केले आहे. तर अनेकांनी अवयवदणाची नोंदणीही केली आहे. लातूर शहरात विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने ८ ते १४ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे..याचाच एक भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या महाशिबिराचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जयंती समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे यांनी सहपत्नी देहदान संकल्प करून तशी नोंदणी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास केली आहे. यावेळी भिकू पयानंद थेरो, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे, डॉ. सदानंद कांबळे.डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. सचिन जाधव डॉ. सुनील होळकर राष्ट्रवादीचे शरद पवार गट अध्यक्ष संजय शेटे. ॲड. संभाजी पाटील, डॉ. विजय अजनीकर, नरसिंग घोडके, यु डी. गायकवाड. बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे, संगपाल शिंदे. ॲड. रमक जोगदंड, इंजिनीयर सचिन गायकवाड, सुजाता अजनीकर, बौद्ध महासभेचे विलास आल्टे, राजाराम साबळे, शोभाताई सोनकांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी तसेच सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894